सत्यमेव जयते

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ११/०२/२०१२.

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/
प्र.क्र.३/का-५, दिनांक- ३१/१/२०१२.

**शु ध्दी प त्र क**

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान/मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना दयावयाच्या निवडणूक भत्ते व आहार भत्त्याच्या दरासंदर्भात दिनांक- ३१/१/२०१२ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यामधील पहिल्या परिच्छेदाखालील अनुक्रमांक-१ व अनुक्रमांक-२ वरील आदेशामध्ये **"निवडणुकीच्यावेळी मतदान/मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दयावयाच्या"** असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याऐवजी पुढीलप्रमाणे वाचण्यात यावे:-

**"निवडणुकीच्यावेळी मतदान /मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना तसेच पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना दयावयाच्या"**

तसेच उपरोक्त दिनांक- ३१/१/२०१२ च्या आदेशामधील पहिल्या परिच्छेदाखाली पुढीलप्रमाणे अनुक्रमांक-३ समाविष्ट करण्यात आला आहे असे वाचण्यात यावे.

**"अनुक्रमांक-३- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या गृह विभागाने मुंबई पोलीस कायदा,१९५१ मधील तरतुदीनुसार विशेष पोलीस**

**अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यास अशा विशेष पोलीस अधिकाऱ्यांना मानधन मंजूर करण्यासंदर्भातील आदेश गृह विभागाने निर्गमित करावेत व त्यासाठी आवश्यक निधी त्या विभागाने उपलब्ध करून दयावा."**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत:-

१. अपर मुख्य सचिव (गृह) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई (दिनांक-३१/१/२०१२ च्या आदेशाच्या प्रतीसह)
२. प्रधन सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व महानगरपालिका आयुक्त
६. सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगर पंचायती

D:\Letter for Code of Conduct. Punedoc.doc/D.O.7

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.०३/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ३१/०१/२०१२

## आदेश

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या निवडणुकीमध्ये मतदान / मतमोजणी केंद्रावरील कर्मचा-यांना तसेच निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी / कर्मचा-यांना दयावयाचा भत्ता हा भारत निवडणूक आयोगाच्या प्रचलित दराप्रमाणे देण्यात यावा असे राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासाठी काढलेल्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आले आहे व त्यानुसार आतापर्यंत निवडणुकांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना भत्त्याचे प्रदान करण्यात येत आहे. मात्र या संदर्भात आयोगाने आदेश निर्गमित केलेले नाहीत. त्यामुळे निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात येणा-या पोलिस अधिकारी व कर्मचा-यांना कोणत्या दराने भत्त्याचे प्रदान करण्यात यावे तसेच त्यासाठीच्या खर्चासाठी कोणत्या विभागाने निधी उपलब्ध करुन दयावा याबाबत आयोगाकडे विचारणा करण्यात येत आहे. सबब भारतीय संविधानातील उपरोक्त तरतुदी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमातील तरतुदीअन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन या प्रकरणी पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१. भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणा-या लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकीच्या वेळी मतदान / मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना दयावयाच्या निवडणूक भत्त्याचे दर तसेच आहार भत्त्याचे दर वेळोवेळी शासनाच्या सामान्य प्रशासन

विभागाकडून निश्चित करण्यात येतात. त्याच दराने महानगरपालिका, नगरपरिषदा व नगर पंचायतींच्या निवडणुकांच्यावेळी निवडणूक भत्ता/आहार भत्त्याचे प्रदान करण्यात यावे. यासाठी होणारा खर्च संबंधित महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायतींनी त्यांच्या निधीतून करावा.

२. जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या निवडणुकींवरील खर्च भागविण्यासाठी शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निधी उपलब्ध करून देण्यात येतो. त्यामुळे या निवडणुकांच्यावेळी मतदान /मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दयावयाच्या निवडणूक भत्ता/आहार भत्त्यासंदर्भात त्या विभागाने आदेश निर्गमित करावेत. सदरचे दर हे, सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येणाऱ्या लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकीच्या वेळी मतदान / मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना दयावयाच्या निवडणूक भत्त्याच्या तसेच आहार भत्त्याच्या दराप्रमाणे असावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-

१. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती